KAYASTH
Caters & Event Management
Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

वर्ष ३ रे | अंक : ७५४ . वा | रविवार | दि. २८ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाणा लोकसभा मतदारसंघात ६२.०३ टक्के मतदान...

## बंद पेटीत असलेले भविष्य येत्या ४ जून रोजी उघडणार

जनसंचलन/बुलढाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २६ एप्रिल रोजी मतदान घेण्यात आले. या मतदानामध्ये बुलढाणा मतदारसंघासाठी ६२.०३ टक्के मतदान झाले. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत जिल्ह्यातील मतदारांनी उत्साहात मतदान केले. बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील नऊ लाख ३३ हजार १७३ पुरुष मतदारांपैकी सहा लाख ३ हजार ५२५, तर आठ लाख ४९ हजार ५०३ महिला मतदारांपैकी पाच लाख २ हजार २२६, तसेच इतर २४ मतदारांपैकी दहा मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदारसंघातील १७ लाख ८२ हजार ७०० मतदारांपैकी अकरा लाख ५ हजार ७६१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघातील मतदारांचा समावेश आहे. यात बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील एक लाख ५३ हजार १६० पुरुष मतदारांपैकी ८६ हजार १६४, तर एक लाख ४० हजार ३२६ महिला मतदारांपैकी ७२ हजार २११, तसेच तेरा इतर उमेदवारांपैकी सहा मतदारांनी हक्क बजावला. बुलढाणा विधानसभा मतदारसंघात एकूण दोन लाख ९३ हजार ४९९ मतदारांपैकी एक लाख ५८ हजार ३८१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ५३.९६ टक्के एवढी आहे. चिखली विधानसभा मतदारसंघातील एक लाख ५१ हजार ९ पुरुष मतदारांपैकी ९७ हजार ४८२, तर एक लाख ४० हजार ६०९ महिला मतदारांपैकी ८३ हजार ९४७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. चिखली विधानसभा मतदारसंघात एकूण दोन लाख ९१ हजार ६१८ मतदारांपैकी एक लाख ८१ हजार ४२९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ६२.२१ टक्के एवढी आहे. सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील एक लाख ६४ हजार ६२९ पुरुष मतदारांपैकी १ लाख ४ हजार ३५५, तर एक लाख ४९ हजार ४४९ महिला मतदारांपैकी ८८ हजार २९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख १४ हजार ७८ मतदारांपैकी एक लाख ९२ हजार ६४८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ६१.३४ टक्के एवढी आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघातील एक लाख ५६ हजार ७१३ पुरुष मतदारांपैकी १ लाख ५ हजार १५०, तर एक लाख ४२ हजार ३८५ महिला मतदारांपैकी ८८ हजार ७९४, तसेच ३ इतर मतदारांपैकी २ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मेहकर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ९९ हजार १०१ मतदारांपैकी एक लाख ९३ हजार ९४६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ६४.८४ टक्के एवढी आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघातील एक लाख ५२ हजार ९६८ पुरुष मतदारांपैकी १ लाख ६ हजार ४०८, तर एक लाख




३७ हजार २० महिला मतदारांपैकी ८५ हजार ७६३, तसेच ४ इतर मतदारांपैकी १ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. खामगाव विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ८९ हजार ९९२ मतदारांपैकी एक लाख ९२ हजार १७२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ६६.२७ टक्के एवढी आहे. जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघातील एक लाख ५४ हजार ६९४ पुरुष मतदारांपैकी १ लाख ३ हजार ९६६, तर एक लाख ३९ हजार ७१४ महिला मतदारांपैकी ८३ हजार २१८, तसेच ४ इतर मतदारांपैकी १ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ९४ हजार ४१२ मतदारांपैकी एक लाख ८७ हजार १८५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ६३.५८ टक्के एवढी आहे.

# जास्वंदी घाटात लक्झरी बस उलटली २० प्रवासी जखमी...

जनसंचलन/जळगाव जा.

इंदूरवरून अकोलाकडे येणारी प्रवासी लक्झरी बस जळगाव जामोद-बऱ्हाणपूर रोडवरील निमखेडीपासून १५ ते २० किमी अंतरावरील मध्य प्रदेशातील जास्वंदी करोली घाटात शनिवारी पहाटे ५ वाजता उलटली. त्यानंतर चाळीस फूट दरीत घसरत गेली. यामध्ये वीस प्रवासी जखमी झाले. जीवित हानी झाली नसल्याची माहिती बऱ्हाणपूर जिल्हा प्रशासनाने दिली. जळगाव जामोद ते बऱ्हाणपूर हा मध्य प्रदेशकडे जाणारा जवळचा मार्ग असल्याने गत काही महिन्यापासून या मार्गाने लक्झरी बसेस ये-जा करतात. हा मार्ग अधिकृत होणे बाकी असला तरी या मार्गाने लक्झरी बसेससह अनेक खासगी वाहने ये-जा करतात. शनिवारी पहाटे ५ वाजता या मार्गाने इंदूरवरून अकोल्याकडे लक्झरी बस येत होती. निमखेडीपासून पुढे मध्य प्रदेशात असलेल्या जास्वंदी करोली घाटात गाडीची बॅटरी खराब झाली. ती दुरुस्त करण्यासाठी चालकाने थांबवली. त्यावेळी मागील चाकाला लावलेला दगड लहान असल्याने ती उतारावरून मागे सरकली व सरळ चाळीस फूट दरीत जाऊन पडली. त्यामध्ये २० प्रवासी जखमी झाले. घटनेची नोंद मध्य प्रदेशातील शहापूर पोलिस ठाण्यात करण्यात आली. तसेच शहापूर व बऱ्हाणपूर येथून तातडीने आरोग्य पथक व पोलिस कुमक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना त्वरित बऱ्हाणपूर येथे रवाना करण्यात आले. त्यांच्यावर तातडीने औषध उपचार करण्यात आले. बसमध्ये अकोला, नांदुरा, खामगाव, जळगाव जामोद, बाळापूर, शेगाव येथील प्रवाशांचा समावेश असल्याची माहिती आहे. तर, काही प्रवासी हे मध्य प्रदेशातील असून, ते अकोला येथे येत होते.



# ट्रकची दुचाकीला धडक साळ्यासह जावई जखमी

जनसंचलन/ खामगाव

भरधाव ट्रकने दुचाकीला धडक देत दोघांना जखमी केले. ही घटना बुधवारी बुलढाणा रोडवरील शिरसगावदरम्यान घडली. तक्रारीवरून ग्रामीण पोलिसांनी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल केला. कंझारा येथील नौशाद खान शहानवाज खान आणि त्यांचा साळा एमएच २८ बीएक्स १४१८ या दुचाकीने खामगावकडे येत होते. त्यावेळी एमएच ४८ एवाय ३२२३ चा चालक नितीन भीमराव ढोरे (रा. इस्तारी नगर घाटंजी जि. यवतमाळ) याने त्याचा ट्रक निष्काळजीपणे चालवून दुचाकीला धडक दिली. यात दुचाकीचे मोठे नुकसान होऊन दोघेही जखमी झाले. या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



# सातगाव भुसारी येथे दोन गटांमध्ये दंगल लाठ्याकाठ्याने मारहाण...

## १८आरोपींना केले अटक २जण जखमी

जनसंचलन/ चिखली



रायपूर पोलीस स्टेशन हद्दीतील चिखली तालुक्यातील गाव सातगाव भुसारी येथे २६ एप्रिलच्या रात्री ९:३०वाजेच्या सुमारास तरुणांच्या दोन गटात किरकोळ वादावरून लाठ्या-काठ्याने मारहाण होऊन दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होत. यात २ तरुण जखमी झाले आहे. रायपुर पोलीस स्टेशनचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली व बुलढाणा, चिखली आणि धाड येथून दंगा पथक अतिरिक्त पोलीस कुमक बोलावून परिस्थिती नियंत्रणात आणली. रात्री दोन्ही गटातील १८आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी२७ एप्रिलला दुपारी ३ वाजता दिली आहे. याबाबत प्राप्त माहिती अशी की सातगांव भुसारी येथील दोन गटात मागील काही दिवसापासून कुणकुण सुरू होती. अशात काल रात्री दोन्ही गट आमोरासमोर आले व एकमेकांना जबर मारहाण केली. त्यामुळे गावातील शांतता बाधित होऊन दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. याप्रकरणी रायपूर पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी अनंता कळमकर यांच्या तक्रारीवर दोन्ही गटातील दंगलखोरावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रीच पोलिसांनी आरोपींचा शोध घेत १८ आरोपींना अटक केली आहे. गावात शांतता व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी बुलढाणा येथून दंगा काबू पथक, तसेच चिखली,धाड पोलिसांना प्राचारण करण्यात आले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांनीही गावात भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. रात्री अटक करण्यात आलेल्या सर्व १८आरोपींना शनिवारी चिखली कोर्टात हजर केले असता त्यांचा जामीन मंजूर करण्यात आला आहे. यापुढे रायपूर पोलीस स्टेशन हद्दीत कुठल्याही गावात कोणत्याही व्यक्तीने कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न केल्यास त्याची पोलीस स्वतः दखल घेऊन अशाच प्रकारची कठोर कारवाई करतील,असा इशारा रायपुर ठाणेदार दुर्गेश राजपूत यांनी दिला आहे. या आरोपींना करण्यात आली होती अटक,,, अटक करण्यात आलेल्या आरोपी मध्ये १विशाल रमेश गाडे २अमोल दत्तात्रय भुसारी ३युवराज संजय काळे४ऋषिकेश अनिल भुसारी ५ अंकलेश गजानन भुसारी६ सागर राजेन्द्र भुसारी७ पंकज दिलीप भुसारी ८विशाल गजानन ढगे ९ऋषिकेश संजय सोनाळकर १० रविन्द्र गणेश वाघ ११स्वप्नील संजय मोरे १२ संजय सुगदेव मोरे १३राहुल राजु मोरे १४सुरज अरुण जाधव १५ सागर वसंता जाधव १६ गणेश सुरेश जाधव १७ राहुल प्रकाश इंगळे १८ प्रविण सखाराम हिवाळे हे सर्व रा.सातगाव भुसारी येथील आहे

# निवडणुकीची धामधूम संपली आता मशागत सुरू...

## निवडणुकीच्या प्रचारात अनेकजण होते व्यस्त

जनसंचलन/बुलढाणा



ग्रामीण भागात लोकसभा निवडणुकीचा शिगेला प्रचार पोहोचल्याने शेती मशागतीची कामे ठप्प झाली होती. गेल्या १० ते १५ दिवसांपासून सर्वच प्रचाराच्या कामात व्यस्त असल्याने शेतीची कामे विस्कळीत झाली होती. २६ एप्रिल रोजी मतदान पार पडल्यानंतर आता शेतकरी, शेतमजूर पुन्हा आपल्या कामांकडे वळले आहेत. निवडणुकीच्या दरम्यान दररोज सायंकाळी उमेदवारांच्या, कार्यकर्त्यांच्या सभा होत होत्या. त्यामुळे, शेतकऱ्यांना मजूरही मिळत नव्हते. उन्हाळ्यामध्ये शेतीची मशागत करणे फायद्याचे असल्याने होळीनंतर शेतकरी शेतीची मशागत करण्यावर भर देतात. म्हणूनच खरीप आणि रब्बी पिके घेतल्यानंतर उन्हाळा सुरू होण्यापूर्वी जमीन चांगली नांगरून तापू दिली जाते. आता पारंपरिक ऐवजी ट्रॅक्टरच्या मदतीने जमीन एक ते दीड फूट खोल नांगरली जात असल्याने ट्रॅक्टरद्वारे मशागतीवर भर दिला जात आहे. सध्या तिन्ही हंगामात पिके घेतली जात असल्याने जमिनीत सतत ओलावा असतो. त्यामुळे जमिनीत बुरशीच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. परिणामी, यावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असून, बऱ्याचदा पीकसुद्धा हाती येत नाही किंवा उत्पादन कमी होते. उन्हाळ्यातील मशागतीमुळे जमिनीतील बुरशी बऱ्याच प्रमाणात नष्ट होते. शिवाय ज्या किडी सुप्त किंवा कोषावस्थेत जातात त्या नष्ट होतात.

# उदयनगर परिसरात ६० टक्के मतदान

जनसंचलन/ उदयनगर

लोकसभेच्या बुलढाणा मतदारसंघासाठी २६ एप्रिल रोजी मतदान पार पडले उदयनगर परिसरात ६० टक्क्यांच्यावर मतदान झाले ग्रामीण भागात मतदारांमध्ये उत्साह होता उदयनगर येथे पाच बूथ होते त्यापैकी बूथ क्रमांक २८ वर १ हजार १३६ पैकी ७२७ मतदारांनी आपला हक्क बजावला बूथ क्रमांक २९ वर १ हजार ३६६५ पैकी ८०३ मतदारांनी मतदान केले. बूथ क्रमांक ३० वर ८७० पैकी ४९२ मतदारांनी मतदान केले बूथ क्रमांक ३१ वर ८३३ पैकी ४८४ मतदारांनी मतदान केले बूथ क्रमांक ३२ वर ९४४ पैकी ३४२ जणांनी मतदान केले गावातील एकूण ५ हजार १४८ मतदारांपैकी ३ हजार ४८ मतदारांनी मतदान केले मतदानाची टक्केवारी ५८ टक्के आहे डासाळा येथे ९२३ पैकी ५९४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

# ठाकरे, पवारांबद्दल सहानुभूतीची लाट, भुजबळांचं निरीक्षण

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट आहे. यंदाची निवडणूक एनडीएसाठी सोपी नसेल, असं मत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केलं आहे. भाजपनं अब की बार ४०० चा नारा दिला आहे. पण त्यामुळे लोकांच्या मनात चलबिचल सुरु आहे. संविधान बदलाची भीती लोकांच्या मनात असल्याचं निरीक्षण भुजबळांनी नोंदवलं. एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केलं.२०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडली. एकनाथ शिंदेंनी बंड करत ४० आमदारांसह भाजपला साथ दिली आणि राज्यात सत्ताबदल झाला. त्यानंतर २०२३ मध्ये अजित पवारांनीदेखील असाश प्रकारे बंड केलं. त्यांनी राष्ट्रवादीच्या आमदारांसह सत्तेत जाण्याचा निर्णय घेतला. गेल्या २ वर्षांत राज्यानं २ प्रादेशिक पक्ष फुटताना पाहिले. त्या पार्श्वभूमीवर होणारी लोकसभा निवडणूक सगळ्याच पक्षांसाठी महत्त्वाची आहे.अजित पवारांच्या बंडात छगन भुजबळांनी साथ दिली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याबद्दल जनमानसात सहानुभूती आहे. त्यांच्याबद्दल असलेली सहानुभूतीची लाट त्यांच्या भाषणांसाठी असलेल्या गर्दीतून दिसून येत आहे. पण तरीही लोकांचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आहे. देशात मजबूत सरकार असावं अशी लोकांची इच्छा आहे, असं भुजबळ म्हणाले.भाजपनं दिलेल्या अब की बार ४०० बार घोषणेवरही त्यांनी भाष्य केलं. संविधान बदलण्यासाठी ४०० पेक्षा अधिक जागा एनडीएला हव्या आहेत, असा प्रचार केला जात आहे. लोकांच्या मनात काही प्रमाणात शंका आहे. भाजपचे कर्नाटकातील खासदार अनंतकुमार हेगडे यांनीही संविधान बदलाबद्दल विधान केलं आहे, याकडेही भुजबळ यांनी लक्ष वेधलं.संविधान सशक्त आहे. त्यात कोणतेही बदल केले जाणार नाहीत, याची ग्वाही खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली आहे. पण तरीही विरोधकांकडून याबद्दलचा प्रचार जोरकसपणे केला जात आहे. याचा परिणाम नेमका काय होणार ते निकालाच्या दिवशीच कळेल, असं भुजबळ म्हणाले.

# गरमीमुळे हवा येण्यासाठी घर उघडे ठेवले असता चोरट्यांनी लंपास केला ऐवज!

जनसंचलन/ देऊळगाव राजा



सिनगाव जहाँ येथे रात्री घर उघडे ठेवणे घरमालकाला चांगलेच महागात पडले. अज्ञाताने घरात प्रवेश करून सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केली. ही घटना सिनगाव जहाँ येथे घडली. सिनगाव जहाँ येथील भानुदास आनंदा बोबडे रा. सिनगाव जहाँ यांचा मुलगा व सून उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे घर उघडे ठेवून घरामध्ये झोपलेले होते. घर उघडे असल्याचा फायदा घेत चोरट्यानी घरातील लोखंडी पेटीमध्ये असलेले एक सोन्याचा ओम वजनी ०१ ग्रॅम, किंमत तीन हजार, बास्केट रिंगा जोड वजनी ३.५ ग्रॅम किंमत १० हजार, झुंबरचे फूल वजनी तीन ग्रॅम, किंमत ९ हजार, लहान मुलीची पाटली तीन जोड किंमत पाच हजार, पैठणी साडी किंमत एक हजार रुपये तसेच रोख ५ हजार असा ३३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# होमगार्ड व पोलीस विरुध्द तक्रार करणाऱ्या सामनाचे पत्रकार वर्मा विरुध्दच गुन्हा दाखल

**जनसंचलन/ खामगाव**

शहरातील मतदान क्रमांक १०६ या केंद्रावर मतदानासाठी आलेल्या वरिष्ठ नागरिक व आपणास मतदानापासून होमगार्ड व पोलीस कर्मचाऱ्यांकडून रोखण्यात आल्याची तक्रार करणाऱ्या दै. सामनाचे पत्रकार संजय ओमप्रकाश वर्मा यांच्याविरुध्द होमगार्डच्या तक्रारीवरुन शासकीय कामकाजात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रथमतः पत्रकार संजय वर्मा यांनी दिलेल्या तक्रारीत २६ एप्रिल २०२४ रोजी नमूद केले आहे की, शेजारी डॉ. सुधाकर तांबट व सौ. अलका तांबट यांना ज्येष्ठ म्हणून माझ्या गाडीने मतदानाला पाठविले व आपण मागुन गेलो. तर ते मतदान करुन पायी परततांना केंद्रावर दिसले. मी त्यांच्यासाठी बाहेर उभी माझी गाडी परिसरात बोलाविली तर त्यासाठी होमगार्ड शेगोकार यांनी मज्जाव केला व त्यावरुन वाद घातला. त्यानंतर मतदानासाठी आत गेलो असता मतदान कर्तव्य बजावतांना पोलीस कर्मचारी कश्यप मॅडम यांनी मला जाब विचारुन कारवाई करण्याची धमकी दिली. तर उपस्थित पी.एस.आय. पाटे यांनीही निघून जाण्यास सांगितले. अन्यथा कारवाई करावी लागेल असे म्हटले. यावेळी काँग्रेस कार्यकर्ते पंकज सातव यांनी हा पत्रकार आहे. याला मतदान करु देवू नका, असे म्हटले आहे. सदर तक्रारीनंतर निवडणूक अधिकारी रामेश्वर पुरी यांच्या आदेशान्वये पोलीस बंदोबस्तात ठाणेदार नाचणकर यांच्या उपस्थितीत पत्रकार वर्मा यांचे मतदान झाले. मतदान आटोपल्यावर रात्री ११ वाजता होमगार्ड शेगोकार यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी पत्रकार संजय वर्मा यांचेविरुध्द शासकीय कामकाजात अडथळा भादंवी कलम ३५३, १८६ लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १३१, १३२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# टाकळी वतपाळ येथील इसमाचा विहिरीत पडून मृत्यू

**जनसंचलन/नांदूरा**

टाकळी वतपाळ येथील एका इसमाचा विहिरीत पडल्याने दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना २५ एप्रिल रोजी रात्री अंदाजे ९:३० वाजेदरम्यान घडली. याबाबत असे की, टाकळी वतपाळ येथील संतोष कौतिकराव वतपाळ वय ४८ वर्षे हे गावातील प्रशांत घुले यांच्यासोबत काही कामानिमित्त काटी शिवारात गेले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्गाच्या बाजुला असलेल्या शालीमार हॉटेलच्या मागे अंदाजे दिडशे फुट खोल असलेल्या विहिरत अंधारात काही दिसल्यामुळे पडून त्यांचा झाला. यादरम्यान विहिरीत पडलेले प्रेत शोधण्यासाठी ओमसाई फाऊंडेशनचे विलास निंबोळकर व त्यांचे सहकारी नांदूरा पोलीस स्टेशन पोलीस निरिक्षक पाटील, विलास पो. कॉ. विक्रांतसिंह राजपूत व त्यांचे सहकारी तसेच टाकळी वतपाळ येथील तरुण गौरव घुले, अजित वतपाळ, निल हनोते, विशाल वतपाळ यांनी रात्रीच न मृत्यू अंधारात अथक परिश्रम करुन रात्री २:३० वाजताच्या दरम्यान प्रेत बाहेर व पुढील कारवाईसाठी मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालय येथे नेण्यात आले. प्रेताचे शवविच्छेदन २६ एप्रिल रोजी सकाळी करुन त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. संतोषच्या अकाली जाण्याने या दुःखद घटनेने गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने वडील व भावाला केली मारहाण

**जनसंचलन/शेगाव**




मुलाने वडीलाला दारू पिण्यासाठी पैसे मागितले असता त्याला पैसे न दिल्यामुळे त्याने वडीलाला व भावाला दगड मारून जखमी केल्याची घटना २६ एप्रिल रोजी दुपारी १ वाजताच्या दरम्यान कुरखेड येथे घडली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबत वृत्त असे की, जलंब पोस्टे अंतर्गत येथून जवळच असलेल्या कुरखेड ता. शेगाव येथील रहिवाशी श्रीकृष्ण रामदास लांजुडकर याने त्याच्या वडरलाला दारू पिण्यासाठी पैसे मागितले असता त्याला पैसे दिले नाही म्हणून त्याने त्याच्या वडीलाच्या उजव्या हातावर दगड मारला. यावेळी त्याचा भाऊ हा मध्ये गेला असता त्याला सुद्धा दगड मारून जखमी केले आहे. अशी तक्रार फिर्यादी महादेव रामदास लांजुडकर रा. कुरखेड यांनी जलंब पोस्टेला दिली. यावरून पोलिसांनी आरोपी श्रीकृष्ण रामदास लांजुडकर रा. कुरखेड याच्याविरुद्ध अप नं. ६/२०२४ कलम ३२४,३२३ भादवि अन्वे गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्ह्यात अवकाळी वादळ वाऱ्यामुळे पिकांचे नुकसान...

**जनसंचलन/बुलढाणा**

मागील काही दिवसांपासून बुलढाणा शहर वगळता जिल्ह्यात बादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. काही भागात गारपीट सुद्धा झाली आहे. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. दरम्यान दिवसभर आकाश निष्प्रभ होते. परंतु संध्याकाळी आकाशात काळे ढग तयार झाले, त्यानंतर काही वेळातच विजेचा गडगडाट व वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने सुरुवात करून दिली. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे काही वेळासाठी का होईना उन्हाच्या काहिली पासून शहरवासीयांची सुटका झाली आहे. तर दुसरीकडे शहरवासीयांना विविध अडचणींचा सामना करावा लागला आहे. प्राप्त माहितीनुसार, संध्याकाळच्या वेळी आलेल्या वादळी वाऱ्याने जिल्ह्यात काही ठिकाणी भयंकर नुकसान केले आहे. अवकाळी पावसाचा फटका ५९ गावातील ३४३०.२० हेक्टर क्षेत्रावरील कांदा बिजोत्पादन, फळबाग, ज्वारी, मका, आंबा, डाळिंब, भुईमुग, केळी, संत्रा, लिंबू, आदी पिकांना बसला. चिखली तालुक्यातील १० गावांमधील ४२७.३० हेक्टर,



खामगाव तालुक्यातील ३९ गावांमधील २८८२.८० हेक्टर, शेगाव तालुक्यातील ५ गावांमधील ३०.१० हेक्टर व देऊळगाव राजा तालुक्यातील ५ गावांमधील ९० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे यात नुकसान झाले आहे.

# शुद्ध मनाने केलेला संकल्प पूर्णत्वास जातो!

## अनिल महाराज चेके यांचे प्रतिपादन श्रीमद् भागवत कथा अखंड हरिनाम सप्ताह

**जनसंचलन/ संग्रामपूर**

आपली वाणी, कर्म व हृदय शुद्ध असेल तर आपले जीवन नक्की सफल होते. आयुष्यात चांगल्या योजनांचा शुद्ध मनाने आणि विचाराने संकल्प करा, तोपण ईश्वरभक्तीने पूर्ण होतो, असे प्रतिपादन हभप अनिल महाराज चेके यांनी केले. वरवट बकाल येथे रूपलाल महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठेनिमित्त भागवत कथा २४ एप्रिल ते २ मेपर्यंत भागवत कथेचे आयोजन केले आहे. त्या कथेचे दुसरे पुष्प त्यांनी गुंफले. मानवाचे जीवन एक पाठशाळा आहे. येथे प्रत्येकाची प्रश्नपत्रिका वेगवेगळी आहे. एकदुसऱ्याची कॉपी करणे जीवनाच्या परीक्षेत चालत नाही. मात्र, चांगल्या विचारांची, आचरणाची कॉपी करायला हरकत नाही, असे सांगून धर्माच्या उत्थानामध्ये खारीचा वाटा असावा, यासाठी मिळकतीमधील काही हिस्सा धर्मासाठी खर्च करावा. तत्त्वाला तर्काची जोड देणे महत्त्वाचे आहे. जे सत्य आहे त्याचा विनाअट स्वीकार करा. आपल्याला जे अनुकूल आहे तेच घडवा. हम हैं पुजारी तत्त्व के, गुरुदेव के आदेश के ईश्वराचा आदेश असल्याशिवाय आयुष्यात काही घडू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. बारी समाजाचे दैवत संत रूपलाल महाराज यांची मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश स्थापनेनिमित्त श्रीमद् संगीतमय भागवत कथा अखंड हरिनाम सप्ताहासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. पहाटे काकडा आरती, दुपारी कथा होत आहे.

# २४ वर्षीय युवकाने गळफास लावून केली आत्महत्या

**जनसंचलन/ खामगाव**



एका २४ वर्षीय युवकाने गळफास लावून आत्महत्या केली. खामगाव तालुक्यातील पिंपळगाव राजा येथे ही घटना गुरुवारी घडली. दीपक सुरेश सातव असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, काही दिवसांपासून तणावात असलेल्या दीपकने साडीच्या साहाय्याने लोखंडी अँगलला गळफास लावून आत्महत्या केल्याचे नातेवाइकांच्या निदर्शनास आले. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले असता, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी पुढील तपास पिंपळगाव राजा पोलिस करीत आहेत. गत काही दिवसांपासून युवकांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे, युवकांशी कुटुंबियांनी संवाद साधण्याची गरज सध्या निर्माण झाली आहे.

# मलकापूर अर्बन बँकेत आणखी एक घोटाळा उघडकीस...







**वृत्तसंस्था/ संभाजीनगर**

मलकापूर अर्बन बँकेत आणखी एक घोटाळा उघडकीस; चलाखी केलेल्या भाजप पदाधिकाऱ्याला ठोकल्या बेड्या याप्रकरणी गुन्हे शाखेने तत्काळ दोन आरोपींना अटक केली आहे. अभिषेक जगदीश जैस्वाल आणि अमरिश जगदीश जैस्वाल अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. घोटाळ्यामुळे आरबीआयने निर्बंध घातल्यानंतर छत्रपती संभाजीनगरमधील मलकापूर अर्बन बँकेत आणखी एक घोटाळा उघडकीस आला आहे. दुसऱ्याच्या प्रॉपर्टीची कागदपत्रे बँकेत जमा करीत ९ कोटींचे कर्ज उचलल्याची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी गुन्हा केला आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने तत्काळ दोन आरोपींना अटक केली आहे. अभिषेक जगदीश जैस्वाल आणि अमरिश जगदीश जैस्वाल अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. अभिषेक जैस्वाल भाजप पदाधिकारी अभिषेक जैस्वाल भाजप पदाधिकारी आहे. विशेष म्हणजे दोन्ही आरोपींनी कर्ज काढल्यावर कुणालाही कानोकान खबर लागू दिली नाही, पण जेव्हा कर्जाचा भरणा झाला नाही, त्यावेळी बँकेने जप्तीची नोटीस काढल्यावर बँकेने कागदपत्रांची पुन्हा तपासणी केली असता हा घोटाळा लक्षात आला. जमिनीची बनावट कागदपत्रे सादर करत नऊ कोटींचं कर्ज दरम्यान, घोटाळ्यामुळे निर्बंध घालण्यात आल्याने मलकापूर अर्बन बँकेचे हजारो खातेदार पैसा अडकल्याने हवालदिल झाले आहेत. खातेदारांचे शेकडो कोटी या बँकेमध्ये अडकल्याने खातेदारांना करायच तरी काय? असा प्रश्न पडला आहे. असे असतानाच हा बनावटपणा समोर आला आहे. या बँकेतून जमिनीची बनावट कागदपत्रे सादर करत नऊ कोटींचं कर्ज घेतल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे अभिषेक जयस्वाल आणि अमरीश जयस्वाल या दोघांना अटक करण्यात आली आहे. अभिषेक जयस्वाल हा भाजपचा पदाधिकारी असून जिल्हा बँकेचा संचालक आहे. त्यामुळे या फसवणूक प्रकरणात वेदांत नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये तत्कालीन बँक व्यवस्थापक आणि इतरांचा सुद्धा समावेश आहे.

# गुप्तांगावर वार करुन प्रियकराची हत्या,प्रेयसीविरुद्ध गुन्हा दाखल

**वृत्तसंस्था/ नागपूर**

पैशांच्या वादातून २७वर्षीय प्रेयसीने गुप्तांग ठेचून ५५वर्षीय प्रियकराची हत्या केली. तपासादरम्यान व शवविच्छेदन अहवालानंतर ही खळबळजनक माहिती समोर आली. याप्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी मारेकरी प्रेयसीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला.काजल अशोक जोगे (रा. साईनगर) असे मारेकरी प्रेयसीचे नाव आहे. अद्याप तिला अटक करण्यात आलेली नाही. रवींद्र कुडवे (रा. व्यासनगर) असे मृतकाचे नाव आहे. ते प्रॉपर्टी डिलर होते. काजलही रवींद्र यांच्यासोबत प्रॉपर्टी डिलिंगचा व्यवसाय करते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१८पासून रवींद्र यांचे काजलसोबत प्रेमसंबंध होते. काही दिवसांपूर्वी काजलचे अन्य एका युवकासोबत लग्न ठरले. साक्षगंधासाठी काजलने रवींद्र यांना पैशांची मागणी केली. रवींद्र यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे काजल संतापली. १९ एप्रिलला तिने रवींद्र यांना फ्लॅटमध्ये बोलाविले व पैशांवरून वाद घातला. वाद विकोपाला गेला. काजलने रवींद्र यांना मारहाण केली. गुप्तांग ठेचून त्यांचा खून केला. त्यानंतर ती रवींद्र यांचा मृतदेह घेऊन उदयनगर




चौकात आली. मृतदेह व त्यांची मोपेड तेथे ठेवली. अपघाताचा बनाव केला व तेथून पसार झाली. याप्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. तपासादरम्यान मारहाण व गुप्तांग ठेचल्याने रवींद्र यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. रवींद्र यांच्या मुलाने हुडकेश्वर पोलिसांत तक्रार दिली.पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केलाकाजलने ऑटोने रवींद्र यांचा मृतदेह व मोपेड उदयनगर चौकात आणली. रवींद्र यांची हत्या करण्यासाठी काजलला दोन ते तीन जणांची मदत केल्याचा संशय आहे. या प्रकरणात काजलची एक महिला नातेवाईकही संशयाच्या भोवऱ्यात आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास केल्यास अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता सूत्रांनी वर्तविली.

# त्यांची खोटेपणाची फॅक्टरी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांची मोदींवर टीका...

**वृत्तसंस्था/ बारपेटा**

काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा मुस्लिम लीगसारखा असल्याचा भाजपचा दावा फेटाळून लावून पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ङमोदींची खोटारडेपणाची फॅक्टरीफ कायम चालणार नाही, असे म्हटले आहे. आसाममधील बारपेटा जिल्ह्यातील कायाकुची येथे एका प्रचार सभेत ते बोलत होते. ङदेशातील बेरोजगारी ही मोठी समस्या आहे आणि ६५ टक्के सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या नाहीत. इंडिया आघाडी नक्कीच सत्तेत येईल आणि भाजपला रोखेल. मोदींच्या भाजपचा नायनाट होईल. आमचे सरकार सत्तेवर आल्यावर महागाईवर नियंत्रण ठेवू आणि आमचे लक्ष गरीब जनतेवर असेल. सरकारी विभागातील ३० लाख रिक्त पदे आम्ही भरणार आहोत,फ असे ते म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खोटारड्यांचे सरदार आहेत,फ असा आरोप करून खर्गे म्हणाले, ङदर वर्षी दोन कोटी नोकऱ्या देणे, काळा पैसा देशात आणणे आणि प्रत्येक नागरिकाला १५ लाख रुपये देणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे अशी खोटी आश्वासने मोदींनी दिली. मोदींची खोटारडेपणाची फॅक्टरी कायम टिकणार नाही. त्यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्याला मुस्लिम लीगचा जाहीरनामा म्हटले आणि तेव्हाही खोटे बोलले.फभाजप देशाची संपत्ती लुटून श्रीमंतांच्या स्वाधीन करीत आहे. मोदींनी आपल्या काही श्रीमंत मित्रांचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले,फ असा दावा खर्गे यांनी केला.पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी ङभारत जोडो यात्रेफचे नेतृत्व केले, तर मोदी ङभारत तोडोफचे काम करीत आहेत. सत्ता जाण्याच्या भीतीने घाबरलेले आणि थरथरणारे पंतप्रधान मोदी सातत्याने काँग्रेस आणि गांधी घराण्यावर हल्ले करीत आहेत. ज्याला गरिबांचे दु:ख जाणवत नाही, त्याला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही,फ असेही खर्गे म्हणाले.आपण राज्यघटना बदल करणार नसल्याचे भाजपचे वरिष्ठ नेते सांगत असले, तरी भाजप सत्तेत आल्यास ते नक्की राज्यघटना बदलतील,फ असा आर-



ोप काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी-वद्रा यांनी केला.वलसाड जिल्ह्यातील आदिवासीबहुल धरमपूर गावात शनिवारी आयोजित प्रचारसभेत त्या बोलत होत्या. वलसाड मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी राखीव असून, तिथून अनंत पटेल हे काँग्रेसचे उमेदवार आहेत. महागाईबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य करून प्रियांका यांनी त्यांनी ङमहंगाई मॅनफ म्हटले आहे. ङपंतप्रधान नरेंद्र मोदी निवडणुकीच्या काळात व्यासपीठावर येताना ङसुपरमॅनफसारखे येतात, मात्र त्यांना ङमहंगाई मॅनफ म्हणून ओळखले पाहिजे,फ असे प्रियांका म्हणाल्याकाँग्रेस अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींच्या आरक्षणाच्या विरोधात आहे आणि ती हिसकावून घेऊ इच्छित आहे, असा खोटा प्रचार पंतप्रधान वारंवार करीत आहेत,फ असा आरोप काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला. ङमोदींचा आरोप पूर्णपणे खोटा आहे. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि इतर काँग्रेस नेत्यांमुळे अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणासाठी राज्यघटनेत तरतुदी करण्यात आल्या, ही वस्तुस्थिती आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींच्या आरक्षणाच्या विरोधात भाजपच आहे,फ असा आरोप रमेश यांनी केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958